


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २३६ • बुधवार दि.१७ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.




# ६ बंडखोर खासदारांच्या स्वतंत्र गटाला लोकसभा अध्यक्षांची मान्यता

## खा.आष्टीकर,जाधवांच्या बदलत्या भूमीकेमुळे परभणी,हिंगोली,नांदेडात खळबळ

**नवी दिल्ली:मागील दोन-चार दिवसांपासून चर्चेत असलेल्या ऑपरेशन टायगर आज अखेर फत्ते झाले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन करत लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांच्याकडे त्याची नोंद केली आहे. या गटाला लोकसभा अध्यक्षांनी मान्यता दिल्याने ठाकरे गटाला मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.**

मंगळवारपासून मुंबई आणि दिल्लीतील राजकीय घडामोडींना वेग आला होता. शिवसेना ठाकरे गटातील सहा खासदार पक्ष सोडणार असल्याच्या चर्चांना अखेर रात्री उशिरा पुष्टी मिळाली. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खा.संजय दिना पाटील, ओमप्रकाश राजेनिंबाळकर, संजय हरिभाऊ जाधव, नागेश पाटील-आष्टीकर, संजय देशमुख आणि भाऊसाहेब वाकचौरे यांनी स्वतंत्र गट स्थापन केल्याचे पत्र लोकसभा अध्यक्षांकडे सादर केले. त्यानंतर या गटाला मान्यता देण्यात आली असून हा गट पुढील काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत विलीन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, ठाकरे गटाचे राज्यसभा खा. संजय राऊत तसेच लोकसभा खा. अनिल देसाई आणि अरविंद सावंत यांनी लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांची भेट घेतली. त्यांनी फुटीर खासदारांच्या गटाला मान्यता देण्यापूर्वी ठाकरे गटाशी चर्चा करावी, अशी मागणी केली. तसेच पक्षाचे विलिनीकरण होऊ शकते, मात्र स्वतंत्र गटाचे विलिनीकरण मान्य करता येत नाही, असा युक्तिवादही त्यांनी अध्यक्षांसमोर मांडला.मात्र, स्वतंत्र गटाला आधीच मान्यता मिळाल्याने ठाकरे गटाच्या या प्रयत्नांना केवळ औपचारिकतेचे स्वरूप आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यामुळे लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयानंतर ठाकरे गटासमोर नवे राजकीय आव्हान उभे राहिले आहे.या घडामोडींमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली असून आगामी काळात शिवसेनेतील राजकीय समीकरणे आणखी बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

**ठाकरे गटातून वेगळा झालेल्या खासदारांची नावे**

संजय दिना पाटील-मुंबई उत्तर-पूर्व, ओमप्रकाश राजेनिंबाळकर-धाराशिव, संजय हरिभाऊ जाधव-परभणी, नागेश बापूराव पाटील-आष्टीकर-हिंगोली, संजय देशमुख-यवतमाळ-वाशीम, भाऊसाहेब राजाराम वाकचौरे-शिर्डी.

## गद्दारी कराल तर याद राखा-खा.संजय राऊत

नवी दिल्ली:शिवसेना (ठाकरे गट) पक्षातील कथित 'ऑपरेशन टायगर' अंतिम टप्प्यात पोहोचल्याच्या चर्चांना वेग आला असतानाच पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी बंडखोरीच्या हालचाली करणाऱ्या खासदारांवर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला. पक्ष सोडून जायचे असेल तर आधी खासदारकीचा राजीनामा द्यावा, गद्दारी कराल तर याद राखा, अशा शब्दात त्यांनी इशारा दिला आहे.

शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर १९ जून रोजी ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावर निवडून आलेल्या नऊ खासदारांपैकी सहा खासदार स्वतंत्र भूमिका जाहीर करणार असल्याची चर्चा सुरू आहे.या पार्श्वभूमीवर पान ४ वर

# खा.आष्टीकरांच्या पक्षांतर चर्चेमुळे विधान परिषद निवडणुकीत नवा ट्विस्ट

## सहल, संशय आणि पक्षांतराच्या सावटात लढत नेमकी कोणाच्या बाजूने?




माहूर/प्रतिनिधी-विधान परिषद निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना माहूरच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे. धनदांडग्यांची समजली जाणारी ही निवडणूक आणि मतदार नगरसेवकांच्या सहल राजकारणामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

माहूर नगरपंचायतीतील सत्ताधारी गटाचे १७ पैकी तब्बल १४ नगरसेवक मतदानापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या सहलीपासून दूर राहून माहूरमध्येच थांबले. त्यामुळे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्या नेतृत्वाखालील नगरसेवकांनी सहलीला नकार देत वेगळा संदेश दिल्याची चर्चा आहे. मात्र दुसरीकडे भाजपच्या एका नगरसेवकासह काँग्रेसमधून भाजप समर्थक बनलेल्या दोन नगरसेवकांनी सहलीचा आनंद घेतल्याने राजकीय वर्तुळात कुजबुज सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर अमर भाऊ, तुम्हाला माहूरच्या स्वपक्षीय नगरसेवकांवरच भरोसा नाही का? असा सवाल राजकीय चर्चांमधून उपस्थित केला जात आहे. नगरसेवकांना सहलीवर नेण्याची गरज का भासली, याबाबतही विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. नांदेड विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या अडचणीत भर टाकणारी आणखी एक चर्चा सध्या जोर धरत आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर हे लवकरच शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा असून त्यासाठी मुहूर्तही ठरल्याचे बोलले जात आहे.यामुळे महाविकास आघाडीतील नगरसेवकांसमोर मोठा प्रश्न उभा राहिला आहे. ज्यांचे वडील विरोधी गटात जाण्याच्या तयारीत आहेत, त्या उमेदवाराला काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि ठाकरे शिवसेनेचे नगरसेवक मतदान करतील का, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण घडामोडींवर महाविकास आघाडीतील कोणत्याही घटक पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष किंवा वरिष्ठ नेत्यांकडून स्पष्ट भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे अनेक नगरसेवक मतदार संभ्रमावस्थेत असल्याचे बोलले जात आहे.राजकीय निरीक्षकांच्या मते, नागेश पाटील आष्टीकर यांच्या संभाव्य पक्षांतराची चर्चा मतदानाच्या तोंडावर रंगल्याने त्याचा थेट परिणाम कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या मतांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वडिलांच्या राजकीय निर्णयाचे पडसाद पुत्राच्या आमदारकीच्या स्वप्नावर उमटणार का? याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.उद्या होणारे मतदान अनेक प्रश्नांची उत्तरे देणार असले तरी सध्या माहूर ते नांदेडपर्यंत एकच चर्चा आहे.

## एकाच षटकात दोन शतके; गिल-ईशानची कामगिरी

लखनऊ:भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील दुसऱ्या वनडे सामन्यात भारतीय फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडत ऐतिहासिक कामगिरी केली. कर्णधार शुभमन गिल आणि यष्टिरक्षक फलंदाज ईशान किशन यांनी एकाच षटकात शतके पूर्ण करण्याचा दुर्मीळ पराक्रम केला.प्रथम फलंदाजी करताना शुभमन गिलने ७७ चेंडूंमध्ये शतक झळकावले. त्यानंतर त्याच षटकातील अखेरच्या चेंडूवर चौकार ठोकत ईशान किशननेही शतक पूर्ण केले.




वीरशिरोमणी महाराणा प्रताप सिंह यांच्या जयंतीनिमित्त हिंगोली नाका भागातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतांना आ.बालाजीराव कल्याणकर, अ.भा.क्षत्रिय महासभेचे मराठवाडा अध्यक्ष पवनसिंह बैस व इतर मान्यंवर दिसत आहेत.

## आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना ५ जुलैपर्यंत गणवेश-ना.डॉ.अशोक उईके

नाशिक:शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना अखेर गणवेश मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, येत्या ५ जुलैपर्यंत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून दिले जातील, अशी माहिती आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिली आहे.

शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या आणि अन्य शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले असले, तरी काही तांत्रिक अडचणींमुळे गणवेश वाटपाला विलंब झाल्याचे त्यांनी मान्य केले. राज्यात आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीत ४९७ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून, त्यामध्ये सुमारे सव्वादोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दरवर्षी शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना दोन गणवेश, नाइट ड्रेस, वह्या, पुस्तके, दप्तर आणि बूट यांचे वितरण केले जाते. मात्र, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात गणवेश आणि नाइट ड्रेसचे वितरण होऊ शकले नव्हते. यंदा २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीही विद्यार्थ्यांना जुनेच गणवेश घालून प्रवेशोत्सव साजरा करावा लागला.

## प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानचे वाङ्मय पुरस्कार जाहीर



नांदेड/प्रतिनिधी-प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानतर्फे २०२४-२५ या रौप्यमहोत्सवी वर्षातील वाङ्मय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक गिरीश कुबेर यांची मातोश्री पद्मिनीबाई बन साधना सन्मानासाठी निवड करण्यात आली असून या सन्मानाचे स्वरूप २१ हजार रुपये, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह असे आहे.

प्रसाद बन वाङ्मय पुरस्कार कवी अजीम नवाज राही यांच्या वळिवाच्या वेळा या कवितासंग्रहाला, तर प्रसाद बन ग्रंथगौरव (राज्यस्तरीय) पुरस्कार लेखिका संगीता अरबुने यांच्या एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी या पुस्तकाला जाहीर झाला आहे. नांदेड जिल्ह्यातील साहित्यिकांसाठीचा ग्रंथगौरव पुरस्कार पान ४ वर

# होय रे भाऊ! आता 'मशाल' बी जाणार की, काय?

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पावसाळ्यापेक्षा जास्त वेगाने स्थलांतर सुरू आहे.फरक एवढाच की, पावसाळ्यात पक्षी स्थलांतर करतात आणि निवडणुका जवळ आल्या की नेते! त्यामुळे काही खासदार दिल्लीकडे रवाना झाल्याची बातमी आली आणि जनतेच्या मनात पुन्हा एकदा जुना प्रश्न जागा झाला. होय रे भाऊ! आता मशाल बी जाणार की काय?

पूर्वी दिल्लीला जाणे म्हणजे संसद, विकास आणि जनतेचे प्रश्न असे समजले जायचे. आता दिल्लीला जाणे म्हणजे राजकीय प्रयोगशाळेत नवीन फॉर्म्युला तयार होत असल्याचा संशय घेतला जातो. चार्टर्ड विमान उडाले की, पक्ष कार्यालयात धडधड वाढते आणि कार्यकर्त्यांच्या मोबाईलची बॅटरी संपते.यावेळी गंमत अशी आहे की, देश युद्धजन्य परिस्थितीच्या छायेतून जात असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना बचतीचे अनेक सल्ले दिले होते. इंधन बचत करा, अनावश्यक खर्च टाळा, विमान प्रवास कमी करा, अशी आवाहने करण्यात आली होती. सामान्य माणूस तर त्यानुसार दोन किलोमीटरसाठी दुचाकीऐवजी चालत जाऊ लागला. पेट्रोलचे दर पाहून अनेकांनी गाडीपेक्षा सायकलला महत्त्व दिले. पण राजकारण म्हणजे वेगळेच विज्ञान!

सामान्य माणूस पेट्रोलचे दोन थेंब वाचवण्यासाठी उन्हात चालतोय आणि इथे एक-दोन खासदारांना घेऊन जाण्यासाठी तीन-तीन चार्टर्ड विमाने आकाशात झेपावत आहेत. जणू काही खासदार नसून दुर्मिळ प्रजातीचे पक्षी स्थलांतर करत आहेत आणि त्यांना स्वतंत्र विमानाची गरज आहे! एका नागरिकाने तर मार्मिक प्रश्न विचारला, ''मोदीजींच्या सूचनांचे पालन फक्त जनतेनेच करायचे का? की चार्टर्ड विमानांना इंधन बचतीच्या नियमातून सूट आहे?'' पूर्वी



राजकारणात विचारधारा महाग होती आणि विमानप्रवास स्वस्त. आता विचारधारा स्वस्त झाली आहे आणि विमानप्रवास महाग झाला आहे. मात्र खर्चाची चिंता कोणालाच नाही. कारण खर्च होतो पक्षाचा, फायदा होतो सत्तेचा आणि मनोरंजन मिळते जनतेला!




बिचारे कार्यकर्ते मात्र मोठ्या संकटात आहेत. त्यांनी धनुष्यबाणाचे झेंडे घेतले, मग मशालीचे घेतले. आता काहींनी तर शहाणपण करून कोरे झेंडेच छापायला सुरुवात केली आहे. गरजेनुसार फक्त चिन्ह बदलायचे. एका मुद्रकाने तर ''पक्षांतर पॅकेज'' जाहीर केल्याची चर्चा आहे. त्यात बॅनर, झेंडे, पोस्टर आणि नवीन नेत्यांचे फोटो एकाच दिवशी मिळतात.जनतेलाही आता या राजकीय मालिकेची सवय झाली आहे. पूर्वी क्रिकेट सामन्यांचा स्कोअर विचारला जायचा. आता ''किती खासदार गेले?'', ''कोण कुणासोबत आहे?'' आणि ''पुढचे विमान कधी उडणार?'' असे प्रश्न विचारले जातात. खरे तर महाराष्ट्रातील राजकारणाने पर्यटन क्षेत्रालाही मागे टाकले आहे. आधी सुरत, मग गुवाहाटी आणि आता दिल्ली. उद्या एखाद्या नवीन शहराचे नाव चर्चेत आले तर आश्चर्य वाटू नये. महाराष्ट्र पर्यटन महामंडळाने आता नवीन घोषवाक्य काढावे, ''राजकीय स्थलांतरासाठी महाराष्ट्र अग्रणी!''


या सगळ्या गोंधळात एक सामान्य मतदार मात्र डोकं खाजवत बसला आहे. तो म्हणतो, ''साहेब, आम्ही मतदान करतो एका पक्षाला, निवडून येतात दुसऱ्या पक्षात, जातात तिसऱ्या पक्षाकडे आणि परत येतात चौथ्या पक्षासोबत. आम्हाला किमान ट्रॅकिंग तरी द्या!'' आणि म्हणूनच आज महाराष्ट्रातील प्रत्येक टपरीवर, चौकात आणि व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये एकच प्रश्न घुमतो आहे. ''धनुष्यबाण गेला, पक्षाचे नाव गेले आता मशाल बी जाणार की काय?'' बाकी काही असो, पण इंधन बचतीचा संदेश देणाऱ्या देशात एका-दोन खासदारांसाठी तीन-तीन चार्टर्ड विमाने उडताना पाहून जनतेला एवढे मात्र नक्की वाटू लागले आहे की, राजकारणात निष्ठेपेक्षा विमानाचे तिकीट जास्त वेगाने बदलते!

# विरोधकविरहित लोकशाही?

**लोकशाही व्यवस्थेचा आत्मा केवळ निवडणुकांमध्ये नसतो, तर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्यातील सुदृढ समतोलात असतो. जनतेने निवडून दिलेले सरकार प्रशासन चालवत असते, तर विरोधी पक्ष सरकारच्या कामकाजावर लक्ष ठेवून जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्याचे कार्य करीत असतात. त्यामुळे सक्षम विरोधी पक्ष हा लोकशाहीचा अविभाज्य घटक मानला जातो. परंतु अलीकडच्या काळात देशातील राजकारणात सुरू असलेल्या पक्षफोडी, गटबाजी आणि पक्षांतराच्या घटनांमुळे भारत विरोधकविरहित लोकशाहीच्या दिशेने तर वाटचाल करीत नाही ना, अशी शंका निर्माण होऊ लागली आहे. पश्चिम बंगालमधील अलीकडच्या राजकीय घडामोडींनी हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आणला आहे. विधानसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेसमधील काही लोकप्रतिनिधींनी स्वतंत्र गट स्थापन केल्याची चर्चा सुरू झाली. त्यानंतर हा गट दुसऱ्या एका राजकीय पक्षात विलीन होण्याची शक्यता व्यक्त केली जाऊ लागली. विशेष म्हणजे ज्या पक्षात विलीन होण्याची चर्चा आहे, त्या पक्षाचे कोणत्याही स्तरावर लोकप्रतिनिधित्व नसल्याचे सांगितले जात आहे. अशा परिस्थितीत मतदारांनी तृणमूल काँग्रेसच्या विचारसरणीला आणि भूमिकेला दिलेला कौल नेमका कुठे गेला?, हा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील परिस्थितीही फार वेगळी नाही. शिवसेना फुटल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठे बदल झाले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बंडामुळे केवळ सरकार बदलले नाही, तर विरोधी राजकारणाचे स्वरूपही बदलले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या फुटीमुळे विरोधी पक्ष आणखी कमकुवत झाला. आता पुन्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील काही खासदार स्वतंत्र गट स्थापन करणार किंवा सत्ताधारी गटात सहभागी होणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. शिवसेनेच्या १९ जूनच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर या चर्चांना अधिक वेग आला आहे. दिल्लीत सुरू असलेल्या हालचाली, बैठका आणि वाढलेल्या राजकीय संपर्कामुळे या शक्यता अधिक गडद होताना दिसत आहेत.या घटनांकडे केवळ पक्षांतर किंवा गटबाजी म्हणून पाहता येणार नाही. या घटनांचा थेट संबंध लोकशाहीच्या आरोग्याशी आहे. विरोधी पक्षातील निवडून आलेले लोकप्रतिनिधी जर सातत्याने सत्ताधारी गटाकडे वळत असतील, तर विरोधी पक्षांची ताकद कमी होत जाते. लोकशाहीमध्ये सरकारला पर्याय असणे आवश्यक असते. सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणारी आणि पर्यायी धोरणे मांडणारी शक्तीच नसल्यास लोकशाहीचे संतुलन बिघडण्याची शक्यता वाढते.गेल्या काही वर्षांत राजकारणाची व्याख्याच बदलल्याचे दिसून येते. पूर्वी एखादा आमदार किंवा खासदार विरोधी पक्षात असला तरी त्याला लोकप्रतिनिधी म्हणून मान्यता आणि प्रभाव मिळत असे. आता मात्र सत्तेतील सहभागालाच अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. मंत्रीपद, निधी, प्रशासकीय अधिकार आणि विकासकामांची गती यासाठी सत्तेच्या जवळ राहणे आवश्यक असल्याची धारणा वाढली आहे. त्यामुळे अनेक लोकप्रतिनिधी सत्ताधारी गटाकडे झुकताना दिसतात. त्यांच्या भूमिकेला काही प्रमाणात व्यवहारिक आधार असू शकतो; परंतु त्यातून मतदारांच्या विश्वासाला धक्का बसत असेल, तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरते.मतदार एखाद्या उमेदवाराला केवळ त्याच्या व्यक्तिमत्त्वामुळे मतदान करीत नाही. तो त्या उमेदवारामागील पक्ष, विचारधारा आणि राजकीय भूमिका यांचाही विचार करीत असतो. निवडणुकीनंतर वारंवार पक्ष बदलण्याची किंवा गट निर्माण करण्याची प्रवृत्ती वाढत गेल्यास जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास कमी होऊ शकतो. त्यामुळे पक्षांतरबंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि जनादेशाचा सन्मान ही काळाची गरज बनली आहे.आज देशात कोणता पक्ष मोठा होतो किंवा कोणता पक्ष लहान होतो हा मुख्य मुद्दा नाही. खरा प्रश्न आहे तो लोकशाहीतील विरोधकांच्या अस्तित्वाचा. विरोधक नसलेली लोकशाही वरकरणी स्थिर वाटू शकते; परंतु दीर्घकालीन दृष्टीने ती लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांनाच कमजोर करणारी ठरू शकते. सत्ताधाऱ्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवणारी व्यवस्था टिकून राहण्यासाठी सक्षम विरोधी पक्ष आवश्यक आहेत.राजकारणात पक्षविस्तार, नवीन आघाड्या आणि नवीन समीकरणे अपरिहार्य असतात. मात्र त्यासाठी विरोधकांचे अस्तित्वच संपविण्याचा प्रयत्न होऊ लागला, तर लोकशाहीची ताकद कमी होईल. म्हणूनच आज देशासमोर उभा राहिलेला सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, आपण सशक्त लोकशाहीकडे वाटचाल करीत आहोत की, विरोधकविरहित लोकशाहीकडे? याचे उत्तर केवळ राजकीय पक्षांनीच नव्हे, तर जनतेनेही शोधण्याची वेळ आली आहे.**

# महाराणा प्रताप:राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि योद्धे होऊन गेले. काहींनी आपल्या सामर्थ्याच्या बळावर मोठी साम्राज्ये उभी केली, तर काहींनी प्रशासन, संस्कृती आणि लोककल्याणाच्या माध्यमातून आपले वेगळेपण सिद्ध केले. परंतु केवळ पराक्रमामुळे नव्हे, तर स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा, स्वातंत्र्यप्रेम आणि अदम्य जिद्दीमुळे जनमानसात अजरामर ठरलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे महाराणा प्रताप. भारतीय संस्कृतीत मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या वीरांची परंपरा आहे. या परंपरेतील तेजस्वी नाव म्हणून महाराणा प्रताप यांचा उल्लेख केला जातो. मेवाडच्या या महान राजाने कोणत्याही प्रकारच्या परकीय अधिपत्यापुढे झुकण्यास नकार दिला आणि जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. त्यामुळेच आजही त्यांचे जीवनचरित्र प्रेरणेचा अखंड झरा मानले जाते.



भारतातील अनेक भागांत तिथीनुसार महाराणा प्रताप यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यंदा १७ जून रोजी तिथीनुसार महाराणा प्रताप जयंती साजरी होत आहे. हा दिवस केवळ एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणाचा नसून स्वाभिमान, त्याग, राष्ट्रभक्ती आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे पुनर्स्मरण करण्याचा आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म राजस्थानमधील कुंभलगड येथे झाला. त्यांचे वडील महाराणा उदयसिंह द्वितीय हे मेवाडचे शासक होते, तर माता जयवंता बाई यांनी प्रताप यांच्या व्यक्तिमत्त्वावर संस्कारांची समृद्ध छाप उमटविली. बालपणापासूनच प्रताप यांच्यात निर्भयता, शौर्य आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. तलवारबाजी, घोडेस्वारी, धनुर्विद्या आणि युद्धकौशल्य यांचे शिक्षण त्यांनी अत्यंत निष्ठेने घेतले. राजपुत्र म्हणून त्यांना राजवैभवाचा अनुभव मिळाला; परंतु पुढील आयुष्यात त्यांनी वनवास, दारिद्र्य आणि संघर्ष यांचाही तितक्याच धैर्याने स्वीकार केला.सोळाव्या शतकातील भारताच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिले असता मुघल साम्राज्याचा विस्तार वेगाने होत होता. सम्राट अकबराने विविध राजपूत संस्थानांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अनेक राजपूत राजांनी मुघल अधिपत्य स्वीकारले; परंतु मेवाडचे स्वातंत्र्य टिकविण्याचा निर्धार महाराणा प्रताप यांनी केला. मेवाड हा केवळ एक प्रदेश नव्हता, तर तो राजपूत स्वाभिमानाचे प्रतीक होता. त्यामुळे मेवाडच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणे प्रताप यांना मान्य नव्हते.इ.स. १५७२ मध्ये महाराणा प्रताप यांचा मेवाडच्या सिंहासनावर राज्याभिषेक झाला. त्या वेळी मेवाड अनेक संकटांनी वेढलेला होता. चित्तौडगड आधीच मुघलांच्या ताब्यात गेला होता. राज्याची आर्थिक स्थिती कमकुवत होती आणि अनेक भागांवर बाह्य दबाव होता. अशा कठीण परिस्थितीत प्रताप यांनी राज्यकारभाराची धुरा सांभाळली. त्यांनी आपल्या प्रजेचा विश्वास संपादन केला आणि मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी अखंड संघर्ष करण्याचा संकल्प केला.

अकबराने अनेक वेळा दूत पाठवून महाराणा प्रताप यांना मुघल अधिपत्य स्वीकारण्याचा प्रस्ताव दिला. परंतु प्रताप यांनी स्वाभिमानाशी तडजोड करण्यास स्पष्ट नकार दिला. त्यांच्यासाठी राज्यापेक्षा स्वातंत्र्य अधिक महत्त्वाचे होते. ते म्हणत असत की परकीय अधीनतेत वैभवशाली जीवन जगण्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी संघर्ष करताना कष्ट सहन करणे अधिक श्रेष्ठ आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे ते भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील अग्रगण्य प्रेरणास्रोत ठरतात.महाराणा प्रताप यांच्या जीवनातील सर्वाधिक प्रसिद्ध घटना म्हणजे हळदीघाटीची लढाई. १५७६ मध्ये मेवाड आणि मुघल सैन्य यांच्यात हळदीघाटी येथे भीषण युद्ध झाले. मुघल सैन्याचे नेतृत्व आमेरचे राजा मानसिंह करत होते, तर महाराणा प्रताप स्वतः आपल्या सैन्याचे नेतृत्व करत होते. संख्येने मुघल सैन्य अधिक बलवान असले, तरी मेवाडच्या सैनिकांनी अद्भुत शौर्याचे दर्शन घडविले. या युद्धात महाराणा प्रताप यांचा प्रिय घोडा चेतक याने दाखविलेली निष्ठा आणि पराक्रम आजही लोककथांचा विषय आहे.चेतक हा केवळ घोडा नव्हता, तर महाराणांचा विश्वासू सहकारी होता. युद्धादरम्यान गंभीर जखमी होऊनही त्याने महाराणांना सुरक्षित स्थळी पोहोचविले. अखेरीस त्याचा मृत्यू झाला. चेतकाच्या निष्ठेची कथा भारतीय जनमानसात आजही भावनिक आदराने सांगितली जाते. महाराणा प्रताप आणि चेतक यांचे नाते हे माणूस आणि प्राणी यांच्यातील स्नेह, विश्वास आणि समर्पणाचे अद्वितीय उदाहरण मानले जाते. हळदीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे संघर्षमय जीवन अधिक कठीण बनले. त्यांनी अरवली पर्वतरांगांमध्ये आश्रय घेतला. कुटुंबासह त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला. दंतकथांनुसार त्यांच्या कुटुंबाला अनेकदा उपासमारीची वेळ आली. जंगलात राहून त्यांनी आपल्या स्वातंत्र्यलढ्याची ज्योत कायम ठेवली. संकटांनी खचून न जाता त्यांनी नव्या जोमाने सैन्य संघटित केले आणि गनिमी काव्याच्या तंत्राचा प्रभावी वापर केला.

महाराणा प्रताप यांच्या संघर्षात भामाशाह यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. भामाशाह हे महाराणांचे विश्वासू सहकारी होते. त्यांनी आपल्या संपत्तीचा मोठा भाग महाराणा प्रताप यांच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी अर्पण केला. या आर्थिक मदतीमुळे महाराणांना सैन्याची पुनर्बांधणी करता आली. राष्ट्रहितासाठी संपत्तीचा त्याग करण्याची प्रेरणा भामाशाह यांच्या उदाहरणातून मिळते.महाराणा प्रताप हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते दूरदृष्टी असलेले प्रशासकही होते. त्यांनी आपल्या राज्यातील जनतेच्या कल्याणाला प्राधान्य दिले. प्रजेच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी विविध उपाययोजना केल्या. शेती, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न केला. जंगलांमध्ये आणि डोंगराळ भागातही प्रशासन प्रभावीपणे चालविण्याची त्यांची क्षमता उल्लेखनीय होती.त्यांच्या राज्यकारभारातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सर्वधर्मसमभाव. महाराणा प्रताप यांनी विविध समाजघटकांना आपल्या संघर्षात सहभागी करून घेतले. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांतील लोक होते. हकीम खान सूर यांच्यासारख्या मुस्लिम योद्ध्यांनीही मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केले.यावरून महाराणा प्रताप यांची राष्ट्रकल्पना ही धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक होती, हे स्पष्ट होते.महाराणा प्रताप यांच्या जीवनातून आत्मसन्मानाचे महत्त्व अधोरेखित होते. आजच्या भौतिकवादी युगात अनेकदा तत्त्वांशी तडजोड करण्याची प्रवृत्ती दिसून येते. अशा वेळी प्रताप यांचे जीवन आपल्याला मूल्यांशी प्रामाणिक राहण्याची प्रेरणा देते. त्यांनी संकटांना घाबरून माघार घेतली नाही. अपयश आले तरी संघर्ष सोडला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही जिद्द आणि चिकाटी आजच्या तरुण पिढीसाठी विशेष मार्गदर्शक ठरते.इतिहासात अनेकदा युद्धांच्या निकालावरून व्यक्तिमत्त्वांचे मूल्यमापन केले जाते; परंतु महाराणा प्रताप यांच्या बाबतीत तसे घडत नाही. हळदीघाटीच्या युद्धात निर्णायक विजय मिळाला नसला, तरी त्यांनी स्वातंत्र्याचा लढा अखंड सुरू ठेवला. पुढील काळात त्यांनी मेवाडमधील अनेक प्रदेश पुन्हा आपल्या ताब्यात घेतले. चावंड येथे त्यांनी नवी राजधानी स्थापन केली आणि राज्याची पुनर्बांधणी केली. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन केवळ युद्धाच्या निकालावर नव्हे, तर त्यांच्या अटळ संघर्षावर केले पाहिजे.महाराणा प्रताप यांच्या चरित्राचा प्रभाव साहित्य, लोककला आणि जनमानसावर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसतो. राजस्थानातील लोकगीतांमध्ये त्यांच्या शौर्याचे वर्णन आढळते. अनेक कवी, लेखक आणि इतिहासकारांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. श्यामनारायण पांडे यांच्या 'हल्दीघाटी' या काव्यातून महाराणा प्रताप यांच्या पराक्रमाचे प्रभावी चित्रण केले गेले आहे. विविध भाषांमधील साहित्यकृतींनी त्यांच्या स्मृती जिवंत ठेवल्या आहेत.

**डॉ.राजेंद्र बगाटे**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही महाराणा प्रताप यांचे उदाहरण प्रेरणादायी मानले गेले. परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेतली. स्वराज्य, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची भावना जागृत करण्यासाठी त्यांच्या जीवनाचा उल्लेख केला जात असे. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत आदर्श व्यक्तिमत्त्वांची गरज असते आणि महाराणा प्रताप हे त्यापैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे.आजच्या काळात महाराणा प्रताप जयंती साजरी करताना केवळ मिरवणुका, पुष्पहार आणि औपचारिक कार्यक्रम यांपुरते मर्यादित राहणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा समाजजीवनात अंगीकार होणे आवश्यक आहे. स्वाभिमान म्हणजे अहंकार नव्हे, तर स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होय. राष्ट्रभक्ती म्हणजे इतरांविषयी द्वेष नव्हे, तर देशाच्या प्रगतीसाठी सकारात्मक योगदान देण्याची वृत्ती होय. त्याग म्हणजे केवळ भौतिक वस्तूंचा त्याग नव्हे, तर सामूहिक हितासाठी वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवण्याची तयारी होय. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून या मूल्यांचे शिक्षण मिळते.तरुण पिढीसमोर आज अनेक आव्हाने आहेत. स्पर्धात्मक जीवनशैली, सामाजिक माध्यमांचा प्रभाव, मूल्यांमधील बदल आणि करिअरची धडपड या सर्वांमध्ये आत्मविश्वास आणि नैतिकतेचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत महाराणा प्रताप यांचे जीवन युवकांना प्रेरणा देऊ शकते. प्रतिकूल परिस्थितीतही ध्येयाप्रती निष्ठा राखणे, परिश्रम करण्यास तयार राहणे आणि संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य बाळगणे ही शिकवण त्यांच्या चरित्रातून मिळते.राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीनेही महाराणा प्रताप यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी विविध समाजघटकांना एकत्र आणून स्वातंत्र्यलढा उभारला. आज विविधतेने नटलेल्या भारताला सामाजिक सलोखा, परस्पर आदर आणि एकात्मतेची गरज आहे. मतभेद असले तरी राष्ट्रीय हित सर्वोच्च मानण्याची वृत्ती समाजात रुजली पाहिजे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून ही प्रेरणा मिळते.इतिहासाचा अभ्यास करताना व्यक्तिपूजेला बळी पडणे योग्य नाही; परंतु महान व्यक्तिमत्त्वांकडून प्रेरणा घेणे आवश्यक आहे. इतिहास हा केवळ भूतकाळाचा लेखाजोखा नसून वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्य घडविणारा मार्गदर्शक असतो. महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला शिकवते की परिस्थिती कितीही कठीण असली, तरी धैर्य, आत्मविश्वास आणि मूल्यनिष्ठा यांच्या बळावर संकटांवर मात करता येते.

महाराणा प्रताप यांचे निधन १५९७ मध्ये झाले. मृत्यूपूर्वीही त्यांनी मेवाडच्या स्वातंत्र्याची चिंता व्यक्त केली होती, असे सांगितले जाते. आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी मातृभूमीप्रती निष्ठा कायम ठेवली. त्यांच्या पश्चातही त्यांच्या संघर्षाची परंपरा जिवंत राहिली. आज अनेक स्मारके, पुतळे आणि ऐतिहासिक स्थळे त्यांच्या स्मृती जागवितात; परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या विचारांचे स्मरण समाजाच्या चेतनेत कायम राहणे आवश्यक आहे.महाराणा प्रताप जयंती हा केवळ एका राजाचा जन्मदिन नाही, तर तो भारतीय स्वाभिमानाचा उत्सव आहे. या दिवशी आपण त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी पैलूंचे स्मरण करून स्वतःला अधिक जबाबदार नागरिक बनविण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, धैर्य, स्वातंत्र्यप्रेम आणि राष्ट्रसेवा ही मूल्ये आपल्या आचरणात उतरली, तरच महाराणा प्रताप यांना खरी आदरांजली वाहिली जाईल.आज भारत प्रगतीच्या नव्या वाटेवर वाटचाल करीत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि अर्थव्यवस्था या क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. तथापि, या प्रगतीला नैतिक मूल्यांची जोड असणे आवश्यक आहे. विकासासोबतच चारित्र्यनिर्मितीही महत्त्वाची आहे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून मिळणारी प्रेरणा या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. त्यांनी दाखवून दिले की भौतिक यशापेक्षा तत्त्वनिष्ठा अधिक मौल्यवान असते.महाराणा प्रताप यांचे चरित्र हे भारतीय संस्कृतीतील तेजस्वी अध्याय आहे. त्यांचा संघर्ष, त्याग आणि स्वाभिमान यांची गाथा पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देत राहील. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचे स्मरण करून राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचा, सामाजिक ऐक्य जपण्याचा आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचा निर्धार करूया. कारण इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचे स्मरण तेव्हाच सार्थ ठरते, जेव्हा त्यांच्या आदर्शांचे प्रतिबिंब आपल्या कृतीत दिसून येते.महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, संसाधने कितीही मर्यादित असली, तरी ध्येय स्पष्ट असेल आणि त्यासाठी अखंड प्रयत्न करण्याची तयारी असेल, तर अशक्य वाटणारी उद्दिष्टेही साध्य करता येतात. स्वाभिमानाची ज्योत तेवत ठेवणारा हा महान योद्धा भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करीत, तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या महाराणा प्रताप जयंतीनिमित्त सर्वांना प्रेरणा, ऊर्जा आणि राष्ट्रसेवेची नवी दिशा लाभो, हीच कृतज्ञ भावना व्यक्त करावीशी वाटते.

# सरकारची शेतकऱ्यांप्रति अनास्था;घोषणांचा भुलभुलय्या;कृती मात्र वेगळीच

## कर्जमाफीचा गाजा वाजा अन् अटीचा फास...

देगलूर/प्रतिनिधी-राज्य शासनाने मोठ्या दिमाखात जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या घोषणेनंतर शेतकऱ्यांमध्ये अशीच किरण निर्माण झाला होता. मात्र शासन निर्णय जीआर समोर आनंद आनंद अल्पआयुष्य ठरला असून, सरकारच्या घोषणांमध्ये आणि प्रत्यक्ष करशील मोठी तफावत असल्याचा आरोप शेतकरी संघटना आणि शेतकऱ्याकडून होत आहे.

निवडणुकीपूर्वी सरसकट कर्जमाफीची भाषा करणाऱ्या सरकारने आता टी-शर्टची जाळी विणून शेतकऱ्यांना पुन्हा एकदा निराश केल्याची भावना ग्रामीण भागातील होत आहे. सध्या शेती क्षेत्र अभूतपूर्व संकटातून जात आहे. त्यांचे वाढलेले दर, बियाणांचा तुटवडा, डिझेलची महागाई, वाढलेले तर आणि सततची नापिकी यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या कोलमडला आहे. अशा परिस्थितीत कर्जमाफी हा दिलासा निर्णय ठरण्याची अपेक्षा होती. मात्र शासनाने घातलेल्या विविध निकषांमुळे लाखो शेतकरी लाभार्थी वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.विशेष म्हणजे २०१९ मध्ये कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या योजनेतून वगळण्यात आली आहे. गेल्या सहा वर्षांत अनेक शेतकरी पुन्हा कर्जाच्या विळाख्यात अडकले आहेत. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि बाजारभावातील घसरण यामुळे त्यांची आर्थिक व्यवस्थेचे अधिकच हलवली आहे. तरीही अशा शेतकऱ्यांना मदतीपासून दूर ठेवणे म्हणजे सरकारची शेतकऱ्याप्रती असलेली अनास्थाच असल्याची टीका होत आहे.नियमित कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली ५० हजार रुपयांचे पुढचा अनुदानही अनेकांना परवडणारे नाही. कारण प्रथम बँकेची थकीत रक्कम भरल्यानंतरच लाभ मिळणार आहे. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनी लाखो रुपयांची थकबाकी भरायची कुठून असा सवाल उपस्थित होत आहे. नांदेड जिल्हा शेतकरी सन्मान संघर्ष समितीचे अध्यक्ष डॉ. भगवान मनोहर मनुरकर यांनी सरकारवर जोरदार टीका करताना, यांनी सरकारवर जोरदार टीका करताना, कृष्णाचा गाजावाजा करून शेतकऱ्यांना स्वप्निल दाखवायचे आणि नंतर आपली शर्तीच्या माध्यमातून त्यांना लाभापासून वंचित ठेवायचे, हे सरकारचे घर बनले आहे, असे म्हटले आहे.शेतकरी नेते कैलास येसगे कावळगावकर यांनीही संताप व्यक्त करताना महागाई, टंचाई आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आधीच डेटा कुठे आला आहे.

अशावेळी मदतीचा हात देण्याऐवजी शासनाने अटीचा फास फोडला आहे. हे धोरण शेतकऱ्यांच्या जगण्याला आधार देणारे नसून त्यांच्या मनाला कारणीभूत ठरणारे आहे, बोचरी प्रतिक्रिया दिली. एकूणच, कर्जमाफीच्या नावाखाली पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या अपेक्षा वर पाणी फिरले जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. घोषणांचा भुलभुलय्या आणि प्रत्यक्षात कटोर अटी यामुळे ग्रामीण भागात तीव्र नाराजी पसरली असून, सरसकट कर्जमाफीची मागणी अधिक तीव्र होत आहे. शासनाने वेळेत भूमिका स्पष्ट करून शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने दिलासा दिला नाही तर येत्या काळात तीव्र आंदोलन उभे केले जाईल अशी शेतकरी नेते व तालुक्याचे शेतकरी प्रतिनिधीशी बोलून दाखविले आहे.

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,प्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, प्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# पीक विमा योजना खरीप हंगाम सन २०२५-२६ अंतर्गत ३८१.३३ कोटी रुपयांची नुकसान भरपाई वितरणाला प्रारंभ

नांदेड/प्रतिनिधी-प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये सोयाबीन पिकाच्या नुकसानीसाठी नांदेड जिल्ह्यातील एकूण ९३ महसूल मंडळापैकी ८५ महसूल मंडळातील विमाधारक शेतकऱ्यांना एकूण ९१३ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. सोयाबीन पिकासाठी जिल्ह्यातील सर्व ९३ महसूल मंडळे पात्र ठरली असून ६ लाख ३४ हजार ६२३ शेतकरी अर्जदारांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.सुमारे ४,४४, ८७९.३७ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित करण्यात आले होते.

दि.१६ मे पर्यंतच्या अहवालानुसार सोयाबीन पिकासाठी ८५ महसूल मंडळासाठी एकूण ९१३ कोटी रुपये नुकसानभरपाई निश्चित झाली असून त्यापैकी प्रथम टप्यात माहे एप्रिल २०२६ मध्ये ४१ महसूल मंडळातील सोयबीन पिक विमाधारक शेतकऱ्यांना ४९९.६० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. आता दुसऱ्या टप्यात ८०:११० कप व कॅप मॉडेलनुसार राज्य शासनाकडील दायित्व ३८१.३३ कोटी रुपये विमा कँपनीकडे नुकतेच जमा करण्यात आले आहेत. यापैकी सोयाबीन पिकासाठी ३८ महसूल मंडळातील पिक विमाधारक शेतकऱ्यांना ३८०.७४ कोटी रुपये नुकसानभरपाई वितरणास सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील ९३ महसूल मंडळापैकी ७९ महसूल मंडळातील नुकसान भरपाई वाटप पूर्णत्वाकडे जात आहे. उर्वरित १४ महसूल मंडळातील ६ महसूल मंडळातील नुकसानभरपाईचा राज्य शासनाकडील हिस्सा प्रलंबित असून ८ महसूल मंडळाची नुकसानभरपाई निश्चितीची प्रक्रिया सुरु आहे. नुकसान भरपाई वितरीत करण्यात येत असलेली ३८ महसूल मंडळे:मालेगाव, भोकर, भोसी, किणी, बिलोली, कुंडलवाडी, देगलूर, खानापूर, मरखेल, धर्माबाद, करखेली, सिरजखोड, निवघा, तळणी, तामसा, जवळगाव, कुरूळा, उस्माननगर, फुलवळ, बोधडी, किनवट, उमरी बा., सावरगाव, शेवडी बा., सोनखेड, मुदखेड, अंबुलगा बु., जांब बु., मुखेड, मुक्रमाबाद, बरबडा, घुंगराळा, नरसी, नांदेड ग्रामीण, तरोडा बु., विष्णुपुरी, वाजेगाव, सिंधी.राज्य शासनाचा हिस्सा प्रलंबित असलेली ०६ महसूल मंडळे: कंधार, इस्लापूर, मांडवी, बारड, नांदेड शहर, वसरणी.नुकसानभरपाई निश्चिती प्रक्रियेत असलेली ०८ महसूल मंडळे: दिग्रस (बु.), जलधारा, सिंदगी (मो.), माहूर, सिंदखेड, वाई बाजार, वानोळा, धानोरा (बु.).विमा कँपनीच्या अद्ययावत माहितीनुसार सोयाबीन, मुग, उडीद, तूर आणि ख.ज्वारी या सर्व पिकाच्या नुकसान भरपाईसाठी एकूण मंजूर रक्कम ९१८.१८ कोटी रुपये असून प्रथम टप्यात माहे एप्रिल २०२६ मध्ये त्यापैकी ५०२ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत.

# वीज समस्यांवर तात्काळ तोडगा काढण्याच्या मागणीसाठी आंदोलनाचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर नाका सब स्टेशनअंतर्गत येणाऱ्या अन्सार कॉलनी, इस्माईल बाग, इस्लामपुरा तसेच अन्य परिसरांमध्ये निर्माण झालेल्या गंभीर वीज समस्यांबाबत राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखाली महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात संबंधित भागांमध्ये कमी-जास्त व्होल्टेज, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, धोकादायक अवस्थेतील वाकलेले विद्युत खांब, डीपीमधील तांत्रिक बिघाड तसेच वीज चोरीमुळे निर्माण झालेल्या समस्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. या समस्यांमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्सार कॉलनी व इस्माईल बाग परिसरासाठी निरंतर योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेला १०० ते २०० केव्हीए क्षमतेचा नवीन डीपी तात्काळ बसवून तो कार्यान्वित करावा, अशी प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याशिवाय, मलंग बाबा परिसरातील वाकलेल्या विद्युत खांबाबाबत नागरिकांनी यापूर्वी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने घडलेल्या दुर्दैवी घटनेची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.महावितरण प्रशासनाने या सर्व प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन सात दिवसांच्या आत आवश्यक कार्यवाही करावी, अन्यथा स्थानिक नागरिकांच्या सहभागाने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी दिला आहे.

# हदगावातील विकासकामांवर नागरिकांचा सवाल;निधी खर्च

## दर्जा आणि पारदर्शकतेची चौकशी करण्याची मागणी

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरात सुरू असलेल्या विविध नागरी विकास कामांबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, कँत्राटदारांची मनमानी, कामांतील पारदर्शकतेचा अभाव आणि शासनाच्या निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शहरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू असतानाही ती कोणत्या योजनेअंतर्गत, कोणत्या विभागामार्फत आणि कोणत्या तांत्रिक निकषांनुसार केली जात आहेत, याची माहिती नागरिकांना उपलब्ध होत नसल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत हदगाव नगर परिषदेला सुमारे २ कोटी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी मंजूर झालेला हा निधी नेमका कोणत्या विकासकामांसाठी खर्च करण्यात आला, कोणत्या भागात कामे करण्यात आली आणि त्याचा नागरिकांना कितपत लाभ झाला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नसल्याने नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.या संदर्भात काही सामाजिक कार्यकर्ते आणि जागरूक नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाकडे वारंवार लेखी स्वरूपात माहितीची मागणी केल्याचे सांगितले जात आहे. मात्र, अद्याप समाधानकारक माहिती मिळाली नसल्याने निधीच्या वापराबाबत संशय व्यक्त केला जात असून पारदर्शकतेची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.दरम्यान, शहरातील विविध प्रभागांमध्ये नवीन रस्ते, नाल्या आणि इतर पायाभूत सुविधा उभारण्याची कामे सुरू आहेत. मात्र, अनेक ठिकाणी संबंधित कामांचे माहिती फलकच लावण्यात आलेले नसल्याने कामाचा खर्च, कालावधी, कँत्राटदाराचे नाव आणि संबंधित विभागाची माहिती नागरिकांपासून लपविली जात असल्याचा आरोप होत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या काही रस्ते कामांच्या गुणवत्तेबाबतही नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा तसेच मंजूर अंदाजपत्रकानुसार कामे होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे नव्याने तयार होणाऱ्या रस्त्यांच्या टिकाऊपणा बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.याशिवाय, काही भागांत अतिक्रमणे कायम ठेवून रस्त्यांची कामे केल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात वाहतुकीच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संबंधित यंत्रणांकडून नियमित पाहणी आणि गुणवत्तेची तपासणी होत नसल्यामुळे अशा प्रकारांना प्रोत्साहन मिळत असल्याची टीकाही होत आहे. शहरातील विकास कामांबाबत वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.बाबूराव कदम कोहळीकर यांनी स्वतः लक्ष घालून निधी खर्च, कामांचा दर्जा आणि पारदर्शकतेबाबत चौकशी करावी, अशी मागणी जागरूक नागरिकांकडून करण्यात येत आहे. शासनाच्या निधीचा योग्य, नियोजनबद्ध आणि पारदर्शक वापर व्हावा, तसेच प्रत्येक विकासकामाची माहिती नागरिकांसाठी खुली करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### अंमली पदार्थ बाळगणाऱ्या तिघांविरुद्ध स्थागुशाची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या विरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिले. यावरुन स्था.गु.शा.च्या पथकाचे पो.नि. अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि.महेश कोरे यांच्या पथकातील अंमलदारांनी ७५ हजार ३५० रुपये किंमतीचा १.५०७ किलो ग्रॅम अंमली पदार्थ गांजा जप्त करुन आरोपी माधव भुक्तरे,शेख जरीना बेगम शे.चाँद व बबाखाला यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे सोळा रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर येथे जिल्हा शल्यचकित्सक डॉ.पेरके यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१६ जून रोजी वैद्यकीय वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांच्या देखरेखीखाली उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे १६ रुग्णांवरती यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

०९ रुग्णांवरती स्त्री कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या व एक वैद्यकीय गर्भपात करण्यात आले. सदर शस्त्रक्रियेसाठी जिल्हास्तरावरून उपजिल्हा रुग्णालय कँधार येथील स्त्री रोग तज्ञ डॉक्टर टोम्पे यांनी सदरच्या शस्त्रक्रिया पार पाडल्या.तसेच ०२ रुग्णांवरती अपेंडिक्स च्या, ०२ हायड्रोसिल आणि ०२ रुग्णांवरती गाठींचे शस्त्रक्रिया करण्यात आल्या. सदरच्या शस्त्रक्रिया उप जिल्हा रुग्णालय कँधारचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन ढवळे यांनी पार पाडले. सदरच्या शिबिरासाठी भूलतज्ञ म्हणून डॉ.अनिल थडके, डॉ.महेश पेटकर, तसेच ओटी स्टाफ मोमिन सिस्टर, शिरगिर सिस्टर, येरेवाड ब्रदर, जमील, गौतम, विजय चेंडके, अहमद तसेच उपजिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे दर महिन्याच्या प्रत्येक मंगळवारी करण्यात येणार आहे आणि डोळ्याचे शस्त्रक्रिया दर महिन्याच्या प्रत्येक शनिवारी करण्यात येणार आहे.तरीही वैद्यकीय अधीक्षक डॉ.नरेश देवनीकर यांनी सदर शिबिराचा लाभ घेण्यासाठी गरजूंनी उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे येवून सदर शिबिरांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

# ग्राहकांच्या तक्रारींमध्ये स्मार्ट मीटरमुळे मोठी घट

नांदेड/प्रतिनिधी-राज्यात महावितरणतर्फे आतापर्यंत १ कोटी २० लाख स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरमुळे अचूक रिडिंग होते. राज्यात स्मार्ट मीटरचे प्रमाण वाढल्यानंतर ग्राहकांच्या वीजबिलाच्या तक्रारी खूप कमी झाल्या आहेत.

स्मार्ट मीटर बसविल्यानंतर संबंधित ग्राहकाला मोबाईल पद्धारे दर तासाला त्याचा वीज वापर मोबाईल फोनवर समजतो. त्यामुळे वीजबिलाबाबत पारदर्शिता राहते. स्मार्ट मीटरमुळे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे ग्राहकाला त्याच्या वीजवापरावर व वीजबिलावर नियंत्रण ठेवणे शक्य होते. स्मार्ट मीटरच्या पद्धारे ग्राहकाला त्या घरात अथवा कार्यालयात अर्थिंगची समस्या अथवा वीजगळती होत असल्यास समजते. त्या माहितीचाही ग्राहकाला लाभ होतो.ग्राहकाने कोणत्या वेळेला किती वीज वापरली हे स्मार्ट मीटरमुळे समजते. त्या आधारे घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वापरलेल्या विजेसाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळते. याशिवाय मोबाईल पद्धारे बिल भरल्यास डिजिटल पेमेंटची सवलत आणि गो ग्रीनची दरमहा दहा रुपये सवलत मिळते.

# पुनर्मूल्यांकनानंतर कृतिका शिंदेची झेप; ९८.२० टक्क्यांसह तालुक्यात प्रथम

धर्माबाद/प्रतिनिधी-फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेत गुरुकुल विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले असून विद्यालयातील विद्यार्थिनी कृतिका दत्ता शिंदे हिने पुनर्मूल्यांकनानंतर ९८.२० टक्के गुण मिळवत तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. मराठी माध्यमाच्या विद्यार्थिनीने सर्व माध्यमांतील प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीने स्थान मिळवल्याने परिसरात तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्राथमिक निकालात कृतिका शिंदे हिला ९७.२० टक्के गुण मिळाले होते. मात्र सामाजिक शास्त्र विषयात अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याचे लक्षात आल्यानंतर तिने आत्मविश्वासाने आपल्या पालकांना या विषयात अधिक गुण मिळण्याची शक्यता असल्याचे सांगितले. त्यानुसार गुरुकुल विद्यालयाने संबंधित विषयाची छायांकित उत्तरपत्रिका मागवून घेतली आणि एसएससी मंडळाच्या नियमानुसार पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज दाखल केला.पुनर्मूल्यांकनाचा ऑनलाइन निकाल जाहीर झाल्यानंतर सामाजिक शास्त्र विषयातील गुणांमध्ये वाढ झाल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे कृतिकाची एकूण टक्केवारी ९८.२० इतकी झाली असून तिने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.कृतिका शिंदेच्या या यशाबद्दल गुरुकुल विद्यालयाच्या अध्यक्षा ज्योती दगडगावे, सचिव मानसा रेड्डी, सर्व संचालक, मुख्याध्यापक मनमोहन कदम तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले. तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भव्य आंतरराष्ट्रीय योग दिनाचे २१ जून रोजी आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-जगभरात २१ जून हा दिवस दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैली, मानसिक स्वास्थ्य आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश समाजात पोहोचविण्याच्या उद्देशाने यंदाही नांदेड जिल्ह्यात भव्य योग दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार २१ जून रोजी स.७ वा. वजीराबाद येथील पोलीस कवायत मैदान येथे होणार असून जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग, जिल्हा योग संघटना आणि लोकमत समूह यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील नागरिक, विद्यार्थी, युवक, क्रीडापटू, योगप्रेमी, स्वयंसेवी संस्था तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांनी केले आहे.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात पूर्वतयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीत विविध विभागांच्या जबाबदाऱ्या निश्चित करून कार्यक्रमाचे नियोजन, सुविधा आणि समन्वय यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, जिल्हा युवा अधिकारी श्रीमती कनकटे, क्रीडा अधिकारी बालाजी शिरसीकर, लोकमत समूहाच्या प्रतिनिधी सपना भागवत तसेच योग विद्या धामचे योगाचार्य, जिल्हा योग संघटनेचे प्रतिनिधी आणि जिल्ह्यात योगाचा प्रचार-प्रसार करणाऱ्या विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# स्वराज राठोड इंडियन आर्मीत दाखल

मुखेड/प्रतिनिधी-तांड्यावर राहून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण व मेहनतीच्या बळावर वाटचाल करणारे स्वराज गणेश राठोड यांची इंडियन आर्मीमध्ये भरती झाली आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण कुटुंबासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्वराज राठोड यांचे आई-वडील ऊसतोड कामगार असून अत्यंत कष्टाच्या परिस्थितीत त्यांनी आपल्या मुलाला शिक्षण व संस्कार दिले. त्यांच्या अथक परिश्रमांचे फळ आज मिळाल्याने कुटुंबातील आजी-आजोबा, आई-वडील तसेच नातेवाईकांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. ग्रामीण व वंचित समाजातील युवकांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर मोठे यश मिळवू शकते, याचे प्रेरणादायी उदाहरण स्वराज राठोड यांनी घालून दिले आहे.


## जाहीर प्रगटन

मे.सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कंधार यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८९/२०२६

अर्जदार : १) सुलोचना भ्र.भाउराव सांगवे, वय ७० वर्षे, धंदा-घरकाम, २) माधव पि.भाउराव सांगवे, वय ५५ वर्षे, धंदा-शेती, ३) परमेश्वर पि.भाउराव सांगवे, वय ५० वर्षे, धंदा-शेती, ४) विश्वनाथ पि.भाउराव सांगवे, वय ४८ वर्षे, धंदा-शेती, ५) बळीराम पि.भाउराव सांगवे, वय ४६ वर्षे, धंदा-शेती, ६) विलास पि.भाउराव सांगवे, वय ४० वर्षे, धंदा-शेती, ७) सुरेखा पि.भुजंग सांगवे वय ४५ वर्षे, धंदा-शेती सर्व रा.उमरज ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार १ चे अर्जदार क्र.२ ते ६ हे अपत्य असून अर्जदार १ ची अर्जदार ७ ही सून आहे. अर्जदार १ चे पती व अर्जदार २ ते ६ चे वडील व अर्जदार नं.७ चे सासरे नामे भाउराव पि.बळीराम सांगवे हे होते ते दिनांक २९.११.२०२५ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार १ चा मुलगा, अर्जदार क्र.२ ते ६ यांचा भाउ व अर्जदार नं.७ चे पती नामे भुजंग पि.भाउराव सांगवे हे होते ते सुध्दा १० वर्षापूर्वी मयत झाले आहेत. वरील अर्जदाराचे म्हणणे आहे की, मयत भाउराव बळीराम सांगवे यांचे अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत भाउराव पि.बळीराम सांगवे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत भाउराव पि.बळीराम सांगवे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-१४/०७/२०२६

आज रोजी दि.१२/०६/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष पी.ए.खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७८०/२०२६
सुमन व इतर वि.निरंक

अर्जदार : १.सुमन भ्र.नारायणराव सुर्यवंशी, वय : ५० वर्षे धंदा : घरकाम, रा.स्नेहनगर,नांदेड, ता.जि.नांदेड, २. जया भ्र.शरद गायकवाड वय : ३३ वर्षे धंदा : घरकाम, रा.प्रतापनगर, छत्रपती संभाजीनगर, ता.जि.छत्रपती संभाजीनगर, ३.चंद्रकांत पि.नारायण सूर्यवंशी वय : ३१ वर्षे धंदा : शिक्षण, रा.ओमकारेश्वरनगर, तरोडा बु.नांदेड, ४. प्रियंका भ्र.मनोज कांबळे वय : २७ वर्षे धंदा : घरकाम, रा.बारड, ता. मुदखेड, जि.नांदेड, ५. श्यामसुंदर पि.नारायणराव सूर्यवंशी वय : २४ वर्षे धंदा : शिक्षण, रा.स्नेहनगर, नांदेड, ता.जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत नारायण पि. वामनराव सुर्यवंशी यांचे वारस आहेत. मयत नारायण पि.वामनराव सुर्यवंशी यांचा दिनांक २४/०२/२०२६ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.३ व ५ ही मयताची मुले व अर्जदार क्र.२ व ४ या मयताच्या मुली आहेत.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी,प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक २७/०७/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दि.१७/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
७ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नांदेड
प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ,चिखलवाडी,
नांदेड. पिन-४३१६०१
जा.क्र.२०२५/जन्म प्रमाणपत्र/सिआर-२६०/२०२५ दिनांक २४/०४/२०२६

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार कैलास बाबुराव कांबळे वय ३६ रा.शंकरराव कॉलनी, तेहरानगर, नांदेड ता.जि.नांदेड मो.नं. ७७०९४९८३५८ यांनी या कार्यालयात त्यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्यांचे नाव बलराज कैलास कांबळे वय ०७ रा.शंकरराव कॉलनी, तेहरानगर, नांदेड ता.जि.नांदेड सदर व्यक्तीचा स्पेशल न्यु. बॉर्न केअर युनीट वुमेन्स हॉस्पीटल,नांदेड ता.जि.नांदेड या ठिकाणी दिनांक १४.०८.२०१९ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक १७.०३.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झालेपासून (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक-२४/०४/२०२६
स्थळ-नांदेड

स्वाक्षरित/-
तहसिलदार नांदेड

# खासदारांचे पक्षांतर उंबरठ्यावर;काँग्रेसच्या रामदास पाटलांचा गेम कोणी केला?

सरफराज दोसानी

माहूर: नांदेड जिल्ह्यातील विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील राजकीय डावपेचांवर आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या सहा महिन्यांपासून उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खा. नागेश पाटील आष्टीकर हे शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होत्या. आता १९ जून रोजी त्यांच्या पक्षप्रवेशाचा मुहूर्त ठरल्याची माहिती समोर येत असल्याने विधान परिषद निवडणुकीत घेतलेल्या निर्णयांवर नव्याने चर्चा रंगली आहे.

नांदेड विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या वतीने सुरुवातीला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रामदास पाटील सुमठाणकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. त्यांना अधिकृत बी-फॉर्मही देण्यात आला होता. मात्र ऐनवेळी मुंबईतील वरिष्ठ नेतृत्वाच्या हस्तक्षेपानंतर उमेदवारीचा निर्णय बदलण्यात आला आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र कृष्णा आष्टीकर यांना महाविकास आघाडीने पाठिंबा दिला.या निर्णयामुळे काँग्रेसचे उमेदवार रामदास पाटील यांना उमेदवारी मागे घ्यावी लागली. या घडामोडीनंतर त्यांनी समाजमाध्यमांवर नाराजी व्यक्त करत, माझ्याकडे ९२ अधिक १७ असे एकूण १०९ मतदारांचे पाठबळ असताना केवळ १३ मतदान असलेल्या पक्षाला उमेदवारी देण्यात आली, अशी खंत व्यक्त केली होती.





राजकीय वर्तुळात आता एकच प्रश्न विचारला जात आहे की, ज्यांच्या पक्षांतराच्या चर्चा अनेक महिन्यांपासून सुरू होत्या, त्यांच्या कुटुंबातील उमेदवारासाठी काँग्रेसच्या उमेदवाराला का माघार घ्यायला लावण्यात आले? महाविकास आघाडीच्या या निर्णयाचा सर्वाधिक फटका रामदास पाटील यांनाच बसल्याचे स्पष्ट दिसत आहे.उद्या होणाऱ्या मतदानात भाजपाचे अमर राजूरकर आणि कृष्णा आष्टीकर यांच्यात थेट लढत होणार आहे. मात्र त्याचवेळी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या संभाव्य शिंदे गट प्रवेशाच्या चर्चेमुळे निवडणुकीतील नैतिकता, पक्षनिष्ठा आणि राजकीय विश्वासार्हता यांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.एकीकडे काँग्रेसचा उमेदवार बाजूला सारला गेला, तर दुसरीकडे ज्यांच्या घराण्याला संधी देण्यात आली त्यांच्याच पक्षांतराच्या चर्चा आता प्रत्यक्षात उतरण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीच्या रणनीतीवर टीका होत असून, या संपूर्ण राजकीय खेळात काँग्रेसचे रामदास पाटील यांचेच सर्वाधिक नुकसान झाल्याची चर्चा मतदारसंघात जोर धरू लागली आहे. राजकारणात मित्र,शत्रू बदलतात, पण निर्णयांची किंमत कार्यकर्ते आणि निष्ठावंत नेत्यांनाच चुकवावी लागते अशी प्रतिक्रिया आता काँग्रेस कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे.

# आता 'ऑपरेशन तुतारी'ची चर्चा

## शरद पवारांची राष्ट्रवादी अलर्ट मोडवर

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील राजकारणात सध्या सुरू असलेल्या ऑपरेशन टायगरच्या पार्श्वभूमीवर आता ऑपरेशन तुतारीची चर्चा रंगू लागली आहे. ठाकरे गटातील सहा खासदार अचानक दिल्लीला रवाना झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला असून या घडामोडींमुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही सावध भूमिका घेतली आहे.

ठाकरे गटातील संभाव्य बंडाची चाहूल लागताच शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या सर्व खासदारांशी तातडीने संपर्क साधला आहे. पक्षाचे वरिष्ठ नेते खासदारांशी संवाद साधून त्यांना विश्वासात घेण्याचा प्रयत्न करत असून, पुढील काही दिवसांत सर्व खासदारांची बैठक घेण्याचे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात ऑपरेशन टायगरबरोबरच ऑपरेशन तुतारीचीही चर्चा सुरू झाली असून, संभाव्य राजकीय घडामोडींचा परिणाम राष्ट्रवादी काँग्रेसवर होऊ नये यासाठी पक्ष नेतृत्वाने खबरदारीचे पाऊल उचलल्याचे मानले जात आहे.

# सागवान लाकूड व ऑटोरिक्षासह साठ हजारांचा मुद्देमाल जप्त

## वनविभागाच्या धडक कारवाईत दोघे जेरबंद



किनवट/प्रतिनिधी-नियतक्षेत्र पाटोदा अंतर्गत राखीव वन रस्त्यालगत अवैध वृक्षतोड करून विना नंबर व विनापरवाना ऑटोरिक्षातून सागवान लाकडाची तस्करी करणाऱ्या दोन आरोपींना वनविभागाच्या पथकाने पाठलाग करून रंगेहात पकडले. या कारवाईत दोन आरोपी अंधाराचा व वाहनांच्या वर्दळीचा फायदा घेऊन पळून जाण्यात यशस्वी झाले. वनविभागाने एकूण ६०,४०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, अटक केलेल्या आरोपींना न्यायालयाने १८ जून पर्यंत वन कोठडी सुनावली आहे. पाटोदा परिसरातील ही घटना घडल्याचे सुत्रांनी सांगितले.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ जून रोजी वनविभागाला पाटोदा वनक्षेत्रातून अवैध सागवान लाकडाची वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे वनअधिकारी व कर्मचाऱ्यांनी पाटोदा येथील राखीव वन रस्त्यावर सापळा रचला. दरम्यान, एक विना नंबरची ऑटोरिक्षा सागी माल घेऊन चिखली बु. गावाकडे जात असताना दिसली. वनविभागाच्या पथकाने तत्परता दाखवत या वाहनाचा पाठलाग केला आणि त्याला अडवले.या ऑटोरिक्षाची तपासणी केली असता, त्यात १०,४०५ रुपये किमतीचे ०.४९२ घनमीटर वजनाचे ८ नग सागी गोल लाकूड आढळून आले. वनविभागाने ५०,००० रुपये किमतीची ऑटोरिक्षा आणि सागवान लाकूड असा एकूण ६०,४०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.घटनास्थळावरून जुबेर खैरोद्दीन शेख (रा.चिखली बु.) आणि मारुती गुरुनाथ केसाळे (रा.चिखली बु.) या दोन आरोपींना वनविभागाने ताब्यात घेतले. मात्र, शेख मज्जु शेख इद्रीस व शेख जाकीर शेख अहमद हे दोन आरोपी रस्त्यावरील वाहनांच्या वर्दळीचा फायदा घेऊन तेथून पसार झाले. या प्रकरणी सर्व आरोपींविरुद्ध भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये वनगुन्हा क्र.०३/२०२६ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना माननीय प्रथम श्रेणी न्यायालय किनवट येथे हजर केले असता, न्यायालयाने त्यांना १८ जून २०२६ पर्यंत वन कोठडी सुनावली आहे. पसार झालेल्या आरोपींचा शोध वनविभागातर्फेघेतला जात आहे.

सदरची धडक कारवाई उपवनसंरक्षक (नांदेड वन विभाग) मनीषा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) श्रीकांत इटलोड आणि वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) बोधडी मा. सी. जी. पोतुलवार यांच्या आदेशान्वये करण्यात आली. या कारवाईत वनपाल शेळके, के. एम. बडूरे, जी. पी. निलपत्रेवार, वनरक्षक विद्या बोर्डे, नरेंद्र चुकलवार, आकाश रंगे, एस.पी. काळे,डी. एम. गड्डे, के.एस.खोत, पवन दांडगे, अमर मुराडे, पवन सोनूने आणि लिपिक ओमप्रकाश मारकवाड यांनी सक्रिय सहभाग घेतला. वनपरिक्षेत्र अधिकारी पोकुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास चालू असल्याचे सांगितले.

# वझरग्यात प्रतिबंधित गुटखा-पान मसाल्याचा साठा जप्त

देगलूर/प्रतिनिधी-महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा करून त्याची अवैध विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवलेल्या वझरगा येथील एका किराणा दुकानदाराविरुद्ध देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील तंबाखूजन्य पदार्थ विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

याबाबत देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३०३/२०२६ नोंद करण्यात आला असून पोलीस जमादार अशोक घूमे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वझरगा (ता. देगलूर) येथील भानुदास कोकणे (किराणा दुकान चालक) याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. पोलीसांनी १६ जून रोजी सायंकाळच्या सुमारास वझरगा येथील जय मल्हार या पत्र्याच्या दुकानावर छापा टाकला. यावेळी शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पान मसाला तसेच सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांचा एकूण ८ हजार १६३ रुपयांचा साठा आढळून आला. हा माल अवैधरित्या साठवून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. महाराष्ट्र राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत जारी केलेल्या अधिसूचनेनुसार गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांची निर्मिती, साठवणूक, वितरण, वाहतूक व विक्री करण्यास बंदी घातली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधिताविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास खानापूर बीटचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हाणमंत शिंदे करीत आहेत.

# नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याचे निर्देश

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड परिमंडलात परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यातील नीट परीक्षार्थींसाठी दि.२१ जून २०२६ रोजी नीट परीक्षा (नॅशनल ईलिजीबिलीटी कम इन्ट्रन्स टेस्ट) नियोजित आहेत. नांदेड जिल्ह्यात ४२ तर परभणी जिल्ह्यात १४ केंद्रांवर दुपारी २ ते ५:१५ या वेळात त्या परीक्षा होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर परीक्षा काळात परीक्षा केंद्रांवर सुरळीत वीज पुरवठ्यासाठी योग्य त्या उपाय योजना करण्याचे निर्देश मुख्य अभियंता राजाराम माने यांनी दिले आहेत. तीनही जिल्ह्यांचे अधीक्षक अभियंता व नांदेड शहर, नांदेड ग्रामीण, भोकर, देगलूर,परभणी, सेलू आणि हिंगोली विभागांचे कार्यकारी अभियंता यांना सुरळीत वीज पुरवठ्यासंदर्भात लेखी पत्राव्दारे कळविले असून संबंधित शाखा अभियंता, उपविभागीय अधिकारी यांनीही परीक्षा कालावधीच्या आधी प्रत्यक्ष परीक्षा केंद्रांना भेटी देऊन आवश्यकतेनुसार वीज पुरवठ्याशी संबधित उपाययोजना करुन त्याचा अहवाल तत्काळ परिमंडल कार्यालयास सादर करण्याच्या सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

# विधानपरिषद निवडणूक मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधान परिषद नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या मतदानाची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून तसेच निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी यादृष्टीने गुरुवार १८ जून रोजी मतदान केंद्र परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत, असे जिल्हादंडाधिकारी नांदेड कार्यालयानी कळविले आहे.

नांदेड जिल्हयातील तहसिल कार्यालय नांदेड, किनवट, हदगाव, भोकर, कंधार, धर्माबाद, बिलोली, देगलूर या मतदान केंद्र परिसरात गुरुवार १८ जून २०२६ रोजी मतदान केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्षकारांचे मंडपे, सर्व दुकाने, मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, निवडणुकीच्या कामाव्यतीरिक्त इतर खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूकीच्या कामाव्यतीरीक्त इतर व्यक्तीस प्रवेश करण्याकरीता प्रतिबंधीत करण्यात आले आहे.हा आदेश, नांदेड विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-२०२६ च्या अनुषंगाने नांदेड जिल्हा हद्दी पावेतो मतदानाच्या दिवशी गुरुवार १८ जून मतदान सुरु झाल्यापासून मतदान संपेपर्यत मतदान केंद्र परिसरासाठी अंमलात राहील असे आदेश जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमित केले आहेत.

# अक्षर विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या गझल मुशायरा व कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी बापू दासरी



नांदेड/प्रतिनिधी-मॉरिशस येथे पार पडणाऱ्या सातव्या अक्षर विश्व मराठी साहित्य संमेलनात होणाऱ्या गझल मुशायरा व कवी संमेलनाच्या अध्यक्ष स्थानी नांदेडचे कवी बापू दासरी यांची निवड करण्यात आली आहे, असे आयोजकांनी नुकतेच जाहीर केले आहे.

गेल्या ४० वर्षापासून मराठी गझल चळवळीत बापू दासरी यांचे सक्रीय योगदान असून, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील अनेक काव्यमैफिली शासकीय कार्यक्रम व गझल मुशायऱ्यांचे बहारदार सूत्रसंचालन करण्याचा लौकिक बापू दासरी यांच्या नावावर आहे. तसेच गेल्या अकरा वर्षापासून नांदेड येथे पार पडणाऱ्या दिवाळी पहाट कार्यक्रमाच्या यशस्वीतेत त्यांचा वाटा असून ते दिवाळी पहाटच्या समितीचे अध्यक्ष आहेत.बापू दासरी यांनी लिहिलेल्या लावणीला आनंद शिंदे यांनी संगीत दिले असून सुरेखा पुणेकरांनी खास शैलीत साखरपुड्याची लावणी गायली म्हणून रसिकांनी त्याचे स्वागत केले आहे. नुकतेच डिसेंबरमध्ये पार पडलेल्या हेमलकसा येथील पहिल्या मराठी राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद दासरींनी भूषविले असून, त्या संमेलनात डॉ. प्रकाश आमटे यांना जीवनगौरव पुरस्कार बापूदासरींच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता हे विशेष! राजपत्रित अधिकारी पदावर काम करून देखील कविता गझल साहित्य यामुळे बापू दासरी यांना सिद्ध हस्तलेखक म्हणून संबोधल्या जाते. दोन राज्यस्तरीय काव्य स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक त्यांच्या नावावर आहेत. मागच्या निवडणुकीमध्ये मतदार जागृती अभियानात दासरींनी लिहिलेले मतदानाचे गाणे राज्यभरामध्ये शासकीय स्तरावर गौरविल्या गेले.राजहंस प्रकाशनाने नुकताच बापू दासरींचा मातृ सुक्त हा काव्यसंग्रह प्रकाशित केला असून, साहित्य भारती या विख्यात साहित्यिक चळवळीचे ते जिल्हाध्यक्ष आहेत. कलांगण प्रतिष्ठान, ललित कला प्रतिष्ठान या सांस्कृतिक संस्थांचे दासरी हे पदाधिकारी असून, दिव्यांग कल्याण आणि जेष्ठ नागरिकांचे कल्याणाच्या चळवळीत देखील ते सक्रिय आहेत. जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे सुद्धा ते सदस्य आहेत.अनेक नवीन गझलकरांना गझल कार्यशाळेत मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या या निवडीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# आता शिंदेसेना १३ खासदारांसह राज्यात मोठा भाऊ

मुंबई/प्रतिनिधी-लोकसभेच्या झालेल्या निवडणुकीत महायुतीमध्ये भाजपचे ९, शिवसेनेचे ७ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा १ खासदार होता. मात्र, ऑपरेशन टायगरमध्ये ठाकरे गटाचे सहा खासदार फोडून त्यांना वेगळा गट स्थापन करण्यात आला आहे. हा गट शिवसेनेत विलीन होणार असल्याने शिंदेंच्या शिवसेनेची ताकद वाढली आहे.

पान १ वरुन

# गद्दारी कराल तर...

संजय राऊत, लोकसभेतील गटनेते अरविंद सावंत, लोकसभेचे प्रतोद अनिल देसाई आणि नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली.यावेळी बोलताना संजय राऊत यांनी नाशिकचे खा.राजाभाऊ वाजे यांच्या निष्ठेचे विशेष कौतुक केले. आज खासदार असू किंवा नसू, पण पक्षाने दिलेले योगदान कधीही विसरता येणार नाही, असे राऊत म्हणाले.बंडखोरीच्या चर्चांवर संताप व्यक्त करताना राऊत यांनी संबंधित खासदारांवर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे यांनी आम्हाला भावाप्रमाणे वागणूक दिली, तर बाळासाहेब ठाकरे यांनी वडिलांसारखे प्रेम दिले. शिवसेना ही आमची आई आहे. शिवसेनेशी गद्दारी करणाऱ्यांना सोडणार नाही. जे करायचे ते त्यांनी करावे, पण हे खासदार नरेंद्र मोदी किंवा एकनाथ शिंदे यांच्या चेहऱ्यावर निवडून आलेले नाहीत. ते उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर आणि मशाल चिन्हावर निवडून आले आहेत. त्यामुळे पक्षाशी बेईमानी केल्यास त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही त्यांनी दिला.

### मोठ्या आर्थिक व्यवहारांचे आरोप

राऊत यांनी काही खासदारांवर आर्थिक व्यवहारांचे गंभीर आरोप करत, काल रात्री मोठी रक्कम मिळाल्यानंतर चार्टर्ड विमानाने काही जण नांदेड आणि पुण्यातून दिल्लीत दाखल झाले, असा दावा केला.

### गुरुवारी संसदीय समितीची बैठक

गुरुवारी ठाकरे गटाच्या होणाऱ्या संसदीय समितीच्या बैठकीसाठी सर्व खासदारांना व्हीप बजावण्यात आल्याचे सांगत, बैठकीनंतर पुढील निर्णय जाहीर करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# कंधार शहरात लवकरच उभारला जाणार महाराणा प्रताप सिंह यांचा अश्वारुढ पुतळा



कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील मुख्य चौकात लवकरच वीर शिरोमणी महाराणा प्रताप सिंह यांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार असून, त्यासाठी सुरू असलेल्या सुशोभीकरणाच्या कामाची पाहणी लोहा-कंधार विधानसभेचे आमदार तथा माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केली.

वीर शिरोमणी महाराणा प्रताप सिंह यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आ.चिखलीकर यांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी पुतळा उभारणी संदर्भातील कामांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.पुतळा उभारणीसाठी आवश्यक असलेल्या परवानग्यांची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी, अशा सूचना त्यांनी नगर परिषद प्रशासनाला दिल्या. तसेच स्मारकाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.यावेळी महाराणा प्रताप स्मारक समितीच्या वतीने आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पुतळा उभारणीसाठी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. कंधार शहराच्या वैभवात भर घालणारा आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देणारा हा अश्वारूढ पुतळा लवकरच नागरिकांच्या भेटीस येणार असल्याने परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

# प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानचे...

डॉ. प्र. दि. जोशी पाटोदेकर यांच्या हे बंध समाजनिष्ठेचे या आत्मकथनाला जाहीर झाला आहे.रविवार, १२ जुलै रोजी नांदेड येथे विशेष समारंभात पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष डॉ. अच्युत बन, निमंत्रक डॉ. सुरेश सावंत आणि संयोजक संजीव कुळकर्णी यांनी दिली.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४